मुद्दा क्र.११

(११)

जळगाव जिल्ह्यातील वनजमिनी निर्वनीकरण करुन अनधिकृतरित्या वाटप केल्याबाबत श्री.अण्णा हजारे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन पूरक पत्र क्रमांक :- एस-१०/२००८/प्र.क्र.३२६/फ-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- ६ ऑगस्ट, २००९

वाचा :-
१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एस-१०/२००८/प्र.क्र.३२६/फ-३ दिनांक ३१.१.२००९.
२) शासन निर्णय पूरक पत्र क्र. एस-१०/२००८/प्र.क्र.३२६/फ-३, दिनाक १४.५.२००९.

प्रस्तावना :

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जळगाव जिल्हयातील वनजमिनी निर्वनीकरण करुन वाटप झाल्यावर त्यांचा गैरवापर झाल्याने त्या पुन्हा वन विभागास महसूल विभागाने परत न केल्याने गैर व्यवहार झाल्याचे श्री.अण्णा हजारे यांच्या तक्रारी शासनस्तरावर प्राप्त झाल्याने याबाबत चौकशी करुन शिफारशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली व सदर समितीची कार्यकक्षा राज्यातील संपूर्ण क्षेत्रासाठी वाढविण्यात आली आहे. मा.अण्णा हजारे यांनी सुचविलेले दोन सदस्य श्री.हेमंत छाजेड, विभागीय वन अधिकारी (नियोजन) दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर. व श्री.मनिष मोघे, गिरगांव, मुंबई यांच्या नावाचा समावेश करुन एकत्रित शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :

या शासन निर्णयान्वये जळगांव जिल्हयातील वनजमिनी निर्वनीकरण करुन वाटप झाल्यावर त्यांचा गैरवापर झाल्याने त्या पुन्हा वन विभागास महसुल विभागाने परत न केल्याने गैर व्यवहार झाल्याचे श्री.अण्णा हजारे याच्या तक्रारी शासनस्तरावर प्राप्त झाल्या आहेत, याबाबत जळगांव तसेच राज्यातील इतर जिल्हयामध्येही अश्या प्रकरणी चौकशी करुन शिफारशी करण्यासाठी खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २) सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय, मुंबई ३२ | सदस्य |
| ३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर | सदस्य |

D:\letter aug.lwp 2

४) उपवन महानिरीक्षक (संधारण) केंद्र शासन, पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली — सदस्य

५) श्री.हेमंत छाजेड, विभागीय वन अधिकारी (नियोजन) दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर — सदस्य

६) अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी श्री.मनिष मोघे, गिरगांव, मुंबई. — सदस्य

७) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग — सदस्य सचिव

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विजय साबळे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-
१) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) सर्व विभागीय आयुक्त.
६) श्री.हेमंत छाजेड, विभागीय वन अधिकारी (नियोजन) दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.
७) श्री. मनिष एम. मोघे, २९ सी, खोताची वाडी, व्ही.पी. रोड, गिरगांव, मुंबई- ४०० ००४.
८) मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) उपवन महानिरीक्षक (संधारण) केंद्र शासन, पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
११) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)/वनसंरक्षक/उपवनसंरक्षक सर्व.
१२) श्री.अण्णा हजारे, राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जि.अहमदनगर.
१३) निवड नस्ती फ-३ कार्यासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

D:\letter aug.lwn 3